**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 11 No. 3** **Jan-Feb 2024**

# उपेक्षिताचे नायक : रघुनाथ नामदेव राऊळ उर्फ भाई राऊळ

**डॉ. किशोर नागनाथ जोगदंड**
इतिहास विभाग प्रमुख, वसुंधरा कला महाविद्यालय, जुळे सोलापूर
**Corresponding Author – डॉ. किशोर नागनाथ जोगदंड**
**DOI- 10.5281/zenodo.10679003**

**प्रस्तावना:**

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर हे ठिकाण सर्वसामान्य जनतेचे श्रद्धेचे स्थान म्हणून ओळखले जाते. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय स्थित्यंतरामध्ये पंढरपूर तालुक्याने महत्वाची भूमिका बजावली आहे आता स्थित्यंतराच्या वाटचालीतील महत्वपूर्ण व्यक्तिमत्व म्हणून सोलापूर जिल्ह्यातील रघुनाथ नामदेव राऊळ उर्फ भाई राऊळ यांच्याकडे पाहिले जाते. त्यांचा जन्म १८ डिसेंबर, १९१६ रोगी पंढरपूर तालुक्यातील तावशी या गावी झाला. शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्यात त्यांनी प्रत्यक्ष काम केले. बाळासाहेब गोडबोले, काणे वकील, बाळासाहेब मोरे, आर. जी. जोशी. एस. एस. जोशी या मित्रांच्या सहवासात त्यांची जडणघडण झाली.

भाई राऊळ हे हरहुन्नरी होते. गळा पहाड़ी आवाजाचा होता. नकला तर बेफामच, अमोघ वक्तृत्व अशी त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये सांगता येतील थोर नाटककार व साहित्यिक मामा वरेरकर, लालजी पेंडसे यांचा सहवास त्यांना लाभला. नाटकात त्यांनी लहान सहान कामे केली. नंतर त्यांनी पंढरपूर व सोलापूर याठिकाणी मोटार धंदा सुरु केला आणि काही दिवसांनी मोटार मालकाच्या मदतीने युनियन काढली. सोलापूरचे प्रख्यात नेते कृ.भि. अंन्त्रोळीकर व भाई बेके यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. त्यात त्यांना यूनियनमध्ये लिखापढीचे काम मिळाले. ते संत पेठेत राहू लागले त्यावेळी बाजूला पारधी समाजाची वस्ती होती. भाईनी त्यांना माणुसकी शिकविली. चांगले वागायला शिकविले पारधी समाज माणसात आला. त्यांच्यात विश्वास निर्माण करण्याचे काम भाईनी केले. ज्याप्रमाणे पारध्यांशी संबंध आला त्याप्रमाणे घडशी, मांग, महार पंढरपुरातील तमाम गोरगरीबांच्या सुख दुःखात रमणारा भागीदार बनून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे काम त्यांनी केले त्यावेळी पंढरपुरातील म्युनिसिपल कामगार लोकांचा परिचय भाईना झाला आणि त्यांनी त्यांची युनियन काढली.[१]

स्वातंत्र्योत्तर काळात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि गोव्याचा स्वातंत्र्य लढा सुरु झाला. त्यात भाईनी उत्साहाने भाग घेतला त्या निमित्ताने ते लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचू शकले. मोठ्या उत्साहाने त्यांनी पंढरपूरची आमदारकी मिळवली, संयुक्त महाराष्ट्राच्या काळातच ते राज्यस्तरावरील पुढारी झाले. वंचित आणि नाकारलेल्या सामान्य लोकांसाठी कार्य करणाऱ्या भाई राऊळ यांच्या कामगिरीचा आलेख खालीलप्रमाणे.

**भाई रॉयिस्ट कसे झाले ?**

रॉयिस्टाच्या पक्षाचे नाव रेडिकल ह्युम्यानिस्ट पार्टी' असे होते रैडिकल म्हणजे अत्यंत पुरोगामी आणि ह्युम्यानिस्ट म्हणजे व्यक्तिवाद त्याचप्रमाणे ईश्वरवाद यापासून भिन्न असणारा 'नव मानवतावादी पक्ष'[२] असे त्या पक्षाला देशात ओळखले जाई. भाई मानवेंद्रनाथ रॉय या पक्षाचे संस्थापक होते. त्याच्या आडनावानेच त्यांच्या पक्षाची विचारसरणी ओळखली जाऊ लागली. रशियातून भारतात आल्यानंतर त्यांनी साम्यवादांशी भावनिक व वैचारिक जवळीक साधणारी रेडिकल ह्युम्यानिस्ट पार्टी' स्थापन केली हा पक्ष मूळ धरु शकत नाही असे पाहून त्यांनी या पक्षाचे विसर्जन करुन गांधीवादाचा पुरस्कार केला.[३] त्यामुळे काही रॉयिस्ट कॉंग्रेसमध्ये गेले, काही कम्युनिस्ट पक्षात परतले काही स्वतंत्रपणे जनसामान्याच्या संघटना स्थापन करून कार्य करू लागले. महाराष्ट्रातील रॉयिस्टाच्या यादीत माजी मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बॅं. तारकुंडे, लोकसत्ताचे पहिले संपादक ह. रा. महाजनी, गोवर्धन पारीख ही नावे ठळकपणे सांगता येतील. सोलापूर जिल्ह्यात सोलापूरचे भाई बेके, भाई ए. के. भोसले आणि पंढरपूरचे भाई राऊळ, प्रभाकर लाड, सांगोल्याचे मधुकर ढोले हे रॉईस्ट झाले. भाई राऊळाचा मुंबईत कम्युनिस्ट नेत्याशी संपर्क आल्यामुळे कामगार चळवळ, कामगार रंगभूमीशी ते समरस झाले.

**भाई राऊळ यांनी स्थापन केलेल्या युनियन**

भाई राऊळ यांना दुबळ्या सामान्य जनतेबद्दल विलक्षण कळवळा होता त्यांनी स्थापन केलेल्या युनियनच्या

नावावरुन त्यामागील त्याची वैचारिक दिशा व त्यामागील भूमिका आपणाला कळून येईल.

१. म्युनिसिपल कामगार युनियन (सफाई कामगार)
२. जिल्हा परिषद मैल कुली संघटना
३. सार्वजनिक बांधकाम खात्यातील मैलकुली संघटना
४. पाटबंधारे खात्यातील कॅनॉल मजदूर संघटना
५. टांगेवाल्यांची संघटना
६. शेतमजूराची संघटना
७. विडी कामगार युनियन'[४]

**बुध्दिहाळ तलावाचे काम करणाऱ्या मजूराचा प्रश्न**

सांगोला तालुक्यात बुद्धिहाळ तलावाचे काम सुरु होते. तेथे मजुरावर अधिकारी स्थानिक पुढाऱ्याच्या सांगण्यावरुन अन्याय करतात, असे भाईना समजले दोन कार्यकर्त्यांना घेऊन भाई पंढरपूरहून रात्रीच्या गाडीने (रेल्वे) निघाले. सांगोल्यास पोहचल्यानंतर दोन सायकली भाड्याने मिळवून कमलापूरला गेले, तेथून ते भाई ढोले यांना घेऊन बुध्दिहाळला सकाळी ७ ला पोहचले. भाईना पाहताच सर्व मजूर गोळा झाले. सर्वांच्या तक्रारी ऐकून इंजिनियरची भेट भाईनी घेतली. त्यांच्या तक्रारीचे निवारण केले. लोकांना दिलासा मिळाला. त्याबरोबर बुध्दिहाळ तलावात जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळविण्यासाठी मदत केली. हा शेतकऱ्याचा प्रश्न विधानसभेत उपस्थित करताना भाई राऊळ म्हणाले एका बाजुने असे क्षेत्र भिजत असताना ज्यांच्या शेतात दसपटीने पीक वाढणार आहे त्यांच्या घरात सोन्याचा घास खाल्ला जाईल. परंतु दुसऱ्या बाजूने शे-दोनशे घरे व १६०० एकर इतके जमिनीचे क्षेत्र या तलावाखाली जाऊन हजारो लोक आपल्या कुटुंबासह आज देशोधडीला लागले आहेत त्यांचा विचार होणे अगत्याचे आहे. नाहीतर त्याची अन्नानदशा होणार आहे.[५] त्यामुळे त्यांची सोय प्रथम करावी असे मत मांडले.

**तावशीची शेतकरी परिषद**

इ.स. १९४९ मध्ये भाई राऊळ यांनी पुढाकार घेऊन तावशी येथे शेतकरी परिषद भरवली. त्यावेळी युध्दजन्य परिस्थितीमुळे धान्य टंचाई होती. पंढरपूर तालुक्यात काम, पण पंढरपूरला धान्य मिळे त्यामुळे तालुक्यातील लोकांना पंढरपूर येथून धान्य घ्यावे लागे म्हणून प्रत्येक बाजाराच्या गावी धान्य दुकान उघडावे अशी शेतकरी परिषदेकडे मागणी केली. साताऱ्याचे आमदार आत्माराम पाटील यांना अध्यक्ष म्हणून बोलविले. त्यांनी शेतकऱ्याच्या समस्या, अडचणी मांडल्या.

**इ.स. १९४६ व इ.स. १९५२ ची निवडणूक**

इ.स. १९४६ साली रॅडिकल पक्षाच्या वतीने विधानसभेची निवडणूक लढविण्याचे भाई राऊळ यांनी ठरविले. पंढरपूरला बाळासाहेब मोरे, सोलापूरला भाई ए. के. भोसले उमेदवार ठरले.[६] भाई राऊळ यांच्या तुफानी वक्तृत्वाने सारा सोलापूर जिल्हा पिंजून काढला. अशाच प्रकारे १९५२ च्या निवडणुकीच्या वेळी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाने वेग घेतला. या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाने भाई राऊळ यांच्या आयुष्यात मोठी क्रांती केली. शाहिर अमर शेख, जगम स्वामी, आणि भाई राऊळ यांनी महाराष्ट्र आपल्या आवाजाने दुमदुमुन सोडला. काँग्रेसच्या मोठ-मोठ्या लोकांना पराभव स्वीकारावा लागला. म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी फलटणच्या मनमोहन राजवाड्यात जिल्हा काँग्रेसची बैठक बोलावून संयुक्त महाराष्ट्र समितीचे ऐक्य तोडण्याचा प्रयत्न केला.[७] तेव्हा भाई राऊळ यांनी जनतेचा विराट मोर्चा फलटणच्या राजवाड्यावर नेला. असाच एक मोर्चा प्रतापगडावर जेव्हा पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु शिवछत्रपतीच्या पुतळयाचे अनावरण करण्यासाठी आले होते. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र समितीने विराट मोर्चा शाहिर अमर शेख, भाई राऊळ यांच्या नेतृत्वाखाली काढाला यावेळी एस. एम. जोशी यांनी भाई राऊळ यांच्या कार्याने प्रभावीत होऊन त्यांची पाठ थोपटली.[८]

**दुष्काळात जनतेला आधार दिला**

इ.स. १९५२ - १९५३ च्या भयाण दुष्काळात लोकांच्या अडचणी प्रत्यक्ष जाऊन समजून घेऊन त्यावेळी लोकांना त्यांनी आधार दिला. सांगोला, पंढरपूर, माढा या तालुक्यातील गावांना सायकलवर जाऊन भेटी दिल्या. लोकांच्या तक्रारी ऐकून त्या सोडविण्यासाठी भाई कलेक्टर, तहसिलदार यांना भेटत आणि पत्रकारांनाही या भेटीचा वृत्तात सांगत. त्यामुळे त्या प्रश्नाना वाचा फुटण्यास मदत झाली.[९] सांगोला, करमाळा व माढा या तीन तालुक्यातील काही खेड्यात भयावह दुष्काळी परिस्थिती होती. या दुष्काळाचे वर्णन करताना व्ही. आर. कुलकर्णी म्हणतात, 'रणरणत्या उन्हात टेभुर्णीहून करमाळयाच्या दिशेने जाताना रस्त्याच्या कडेला जनावरांचे सांगाडे कुजलेल्या शरीराची दुर्गंधी सोडत होते. प्रवासात एकही झाड दिसत नव्हते. जेऊरला गेल्यावर एक मध्यमवयीन स्त्री आमच्या खांद्यावरील वॉटरबॅग पाहून जवळ आली आणि तिने आपल्या अर्भकासाठी कपभर पाण्याची मागणी केली. तेव्हा भाई राऊळ यांनी आपली वॉटरबॅग तिला देऊन टाकली.[१०] भाई राऊळ जसे कलेक्टरला भेटत तसेच ते भाई छन्नुसिंग, तात्या गुर्जर, माजी खासदार जयवंत घनश्याम मोरे, काणे वकील, नामदेवराव, जगताप यांना भेटून त्याच्या सह्याचे निवेदन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व पंतप्रधान पंडीत नेहरु यांनाही दिले. त्यामुळे इ.स. १९५२ च्या दुष्काळी भागात तलावाची कामे सुरु झाली व त्या कामाची पाहणी पंतप्रधान नेहरु यांनी केली.[११] त्यावेळी भाई राऊळ यांनी पंतप्रधान पं. नेहरु यांना बालक केंद्र, पाण्याचे टँकर सुरु करावे, लोकांना क्रेडीट कार्ड द्यावे अशा मागण्या केल्या.

**भाई राऊळ - समितीचे आमदार**

संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा प्रमुख पक्ष होता. इ.स. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेसविरोधी इतर पक्षाप्रमाणे भारतीय कम्युनिस्ट पक्षाला भरपूर यश मिळाले.[१२] थोडक्यात संयुक्त महाराष्ट्र समितीमधील सर्वच पक्षांना कॉंग्रेसविरोधी चांगले

यश मिळाले भाषावार प्रांतरचनेच्या आधारे संयुक्त महाराष्ट्राची मागणी एवढ्या आवेशाने लढविली गेली व शेवटी ती पुर्ण करुन घेतली.[१३] या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या माध्यमातून पंढरपूर तालुक्यातून भाई राऊळ आमदार झाले. महाराष्ट्र राज्याची निर्मिती व्हावी यासाठी पंढरपूर तालुक्याने महत्वपूर्ण भूमिका बजावली[१४]

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या प्रचार आणि प्रसारासाठी नाना पाटील, आचार्य अत्रे, कॉ. डांगे आणि एस.एम.जोशी इत्यादी नेत्यांनी शहर आणि तालुक्यामध्ये प्रचार केला. तसेच समितीच्या ध्येयाचाही मंडळी प्रचार करत होती. त्यांना सहकार्य करण्याचे काम भाई राऊळ यांनी केले. भाई राऊळ सुध्दा उत्तम वक्ते होते, म्हणून भाई राऊळ यांच्याबद्दल आचार्य अत्रे म्हणतात. "भाई राऊळ अन्न खातो आणि पेट्रोल ओकतो"[१५] १९५७ ला महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका लागल्या. पंढरपूर मतदार संघात काँग्रेस पक्षाने तात्या गुर्जर यांना तिकिट देऊन उभा केले तर संयुक्त महाराष्ट्र समितीने भाई राऊळ यांना तिकिट दिले. भाई राऊळ यांनी निवडणुकीत ऐतिहासिक विजय झाला आणि महाराष्ट्राला पंढरपूर तालुक्याने संयुक्त महाराष्ट्र समितीचा पहिला आमदार दिला.

**भाई राऊळ यांचे विधासभेतील कार्य**

भाई राऊळ यांनी २४ जून १९५७ ते १० एप्रिल १९५८ मध्ये विधानसभेत केलेल्या भाषणातून शेतसारा, कर्ज, जमीन धारणा, रेशन दुकान, दुष्काळ, महागाई, शिक्षकभरती, वीज, पाणी व शेतकरी कामगार यांच्या विविध समस्या मांडल्या. त्याची सोडवणूक करण्यासाठी सरकारला उपायही सांगितले.

१. मैलकुली कामगारांना किमान वेतन कायदा लागू करावा इतर कामगाराप्रमाणे रजा, महागाई भत्ता, प्रॉव्हिडंड फंड इ. सवलती घ्याव्यात.'

२. सरकार यंत्रणा खूप संत गतिने चालते असा आरोप करून कामगार व बुध्दीहाळ तलावात जमीन गेलेल्या शेतकऱ्यांचे प्रश्न मांडून ते त्वरीत सोडवावेत असे सांगितले. आणि शेतकऱ्यांना गाळपेर जमीन द्यावी असा उपाय सुचवला.[१६]

३. लोकसंख्येच्या प्रमाणात स्वस्त धान्य दुकानांना परवाना घ्यावे.[१७] पी.डब्ल्यू.डी खात्याच्या कारभारामुळे सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ पडला यांचे स्पष्टीकरण देताना भाई राऊळ म्हणाले की, शेतकी आणि जंगल खात्याच्या बाबतीत अधिक जागरुकतेची आवश्यकता आहे. लिफ्ट इरिगेशनच्या योजनेसाठी लाखो रुपये किंमतीची इंजिने खरेदी करण्यात आली. यातील बहुतांश इंजिने पडून राहिली त्यामुळे लाखो रुपयाचे नुकसान झाले."[१८] त्यामुळे शेती आणि शेतकऱ्याच्या स्थितीत सुधारणा झाली नाही.

५. चौथ्या श्रेणीतील कर्मचारी (भंगी) यांना पगार व महागाई भत्ता देण्यात यावा.'

६. शेतकऱ्याच्या मालाला भाव ठरविताना उत्पादन खर्चाच्या आधारावर ठरवावा कामगार संघटित झाला तर शेतकरी संघटित होईल. यांची जाणीव सरकारला करुन दिली.

७. सोलापूर गिरणी कामगारांच्या प्रॉव्हिडंड फंड रक्कमा सरकारने द्याव्यात या मागणीला सोलापूर गिरणी कामगार संघानेही पाठिंबा दिला होता.

८. अस्पृश्य व मागासलेल्या लोकांच्या व्यथा मांडून त्यांच्या प्रगतीबाबत त्यांना जगण्याची साधने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तरच त्याची आर्थिक उन्नती होईल. हॉटेलात प्रवेश, देवालये अस्पृश्यांसाठी मोकळे करा, अशा सवलती देण्यात येतात. मागासलेल्या जाती-जमाती मागतात एक, देतात दुसरेच, ते मागतात भाकरी ते सोडून त्यांना हॉटेलात जाण्याची परवानगी देण्यात येते.. अशा कडक शब्दात त्यांनी सरकारकडे मागण्या मांडल्या. अशा विविध स्तरावरचे प्रश्न मांडून भाई राऊळानी विधीमंडळ गाजवले.

**भाईचा अकाली मृत्यू**

भाई राऊळ मुंबईला असेब्लीत हजर राहण्यासाठी रेल्वेने जात असताना कर्जत येथे त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचे १४ एप्रिल १९५८ रोजी निधन झाले. त्याच्या या दुःखद निधनाबद्दल दै.केसरीत पुढील माहिती सांगितली आहे, "पंढरपूर भागातील संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचे ते आधार स्तंभ होते.[१९] तर त्याच्या मृत्यूच्या शोक प्रस्तावात मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणाले,**"He was always a champion of the down-trodden'**[२०] सर्वसामान्याच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी त्यांनी फार मेहनत घेतली.

**संदर्भ टीपा:**

1. कै. आमदार भाई राऊळ, स्मरणिका (संपादक द.प्र. नाईकनवरे) २०००, पृ.क्र.८.
2. आधारवड, आमदार भाई राऊळ, जीवन चरित्र लेखासंग्रह, भाई राऊळ गौरव सहकारी होते.
3. कित्ता, आधारवड, पृ.क्र. ४६.
4. प्रत्यक्ष मुलाखत, बाबासाहेब रंगनाथ बाळेकर, भाईचे सहकारी होते. P.W.D. कामगार संघटना केनॉल मेलकुली संघटनेमध्ये काम केले तसेच इ. स. १९६५ च्या अन्नधान्य चळवळीत सहभाग घेतल्यामुळे अटक झाली आणि येरवडा जेलमध्ये ठेवण्यात आले होते.
5. आमदार भाई राऊळ यांचा विधानसभेतील प्रश्न, दि.१५ जुलै, १९५७.
6. पूर्वोक्त, आधारवड, पृ.क्र.११.
7. कित्ता, आधारवड, पृ.क्र.११.
8. कित्ता, आधारवड, पृ.क्र.११.
9. सायं दैनिक, निर्भिड आपलं मत, दि.१७ डिसेंबर, २०१०, हा लेख लिहणारे व्ही.आर. कुलकर्णी. पत्रकार होते तसेच भाई राऊळ यांचे मित्रही होते.

10. सायं. दैनिक, निर्भिड आपलं मत, दि.१७ डिसेंबर, २०१०.
11. सायं. दैनिक, निर्भिड आपलं मत, दि.१७ डिसेंबर, २०१०.
12. पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास, महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष राजकीय वाटचाल, समकालीन. प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, पृ.क्र.१४९.
13. संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज काळे भगवान (संपा) संकेत प्रकाशन, जालना, प्रथम आवृत्ती
14. २३ जानेवारी, १९८८, पृ.क्र.३६.
15. कित्ता, पृ.क्र.३६.
16. के. आमदार भाई राऊळ, स्मरणिका (संपा. नाईकनवरे द.प्र.) २०००, पृ.क्र.४.
17. आमदार भाई राऊळ, विधानसभेतील भाषण, दि.३० जुलै, १९५७.
18. आमदार भाई राऊळ, विधानसभेतील भाषण, दि. ४ डिसेंबर, १९५७.
19. आमदार भाई राऊळ, विधानसभेतील भाषण, दि.१२ डिसेंबर, १९५७.
20. आमदार भाई राऊळ, विधानसभेतील भाषण, दि.२८ डिसेंबर, १९५७.
21. यशवंतराव चव्हाण, विधानसभेतील शोक प्रस्तावावरील भाषण, दि.१४ एप्रिल, १९५८.